नियमित दिवाणी मुकदमा क्र.१०४/२००५
नि. ९६ लगत

शपथेवर सुरू

पुढील उलटतपास वादीतर्फे विधिज्ञ श्री. आर.डी. आंबिये यांचेमार्फत

३३. हे म्हणणे खरे आहे की, आमचा भाडोत्रीपणा हा दावा मिळकतीपूरता मर्यादीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीत आमची घर क्र. १५९ वॉर्ड 'जी' ही शेड आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या शेडचा वापर 'दुभाषी सॉ मिल'करीता होत होता. साक्षीदार सांगतो की, त्या ठिकाणी पिठाची गिरीणी व भाताचा हॉलरसुध्दा होता. हे म्हणणे खरे आहे की, सॉ मिल चालविण्याकरीता वन विभागाकडून आरा गिरण परवाना आवश्यक असतो. दुभाषी सॉ मिल मध्ये एकच उभ्या प्रकारचे मशिन होते. आम्हाला उभ्या मशिनसाठी परवानगी होती. मी दुभाषी सॉ मिल यांना प्राप्त झालेले परवाने पाहिलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, ते परवाने दावा मिळकतीकरीता नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, दुभाषी सॉ मिल ही संध्या झिरंग रोड स.क्र.२८ हि. क्र.३ मध्ये आहे. दूभाषी सॉ मिल ही दावा मिळकतीतून स.क्र. २८ हि.क्र. ३ मध्ये स्थलांतरीत करण्यासाठी मी परवानागी घेतलेली आहे. ते स्थलांतर आम्ही एक वर्षापूर्वी केलेले आहे व तेथे लाकूड कापण्यासाठीचे उभे मशिन आम्ही बसलेले असून ते मशिन दावा मिळकतीत असलेल्या सॉ मिल मधून काढून तेथे बसवलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या लगत जुनी स्टेट बॅक ऑफ इंडिया ज्या ठिकाणी होती ती इमारत, लगत मालदार यांची रहिवाशी इमारत, समोर विठ्ठल मंदीर अशा प्रकारे गजबलेल्या भागात व लोकवस्तीत ती सॉ मिल होती. सॉ मिल जवळील लोकांना प्रदुषणाचा त्रास होत असल्यामुळे त्यांनी सॉ मिलच्या विरूध्द तक्रारी केल्या होत्या हे मला माहिती नाही. माझे वडिल कॉग्रेसचे नेते होते. माझ्या वडीलांनी सॉ मिलच्याच काही भागामध्ये

कॉंग्रेसचे कार्यालय सुरू केले होते हे मला आठवत नाही. मला आता नि. १२६ लगत दाखल केलेला दिनांक २७/११/२०११ रोजीचा तरूण भारत या वृत्तपत्राची प्रत दाखवली त्यामध्ये माझे वडील व इतर लोकांची छायाचित्र आहेत. त्या वृत्तपत्रास **नि. १२७** दिली आहे.

३४. दुभाष सॉ मिल यांचे आरा गिरणी परवाने सन २००० साली निलंबित करण्यात आले हे मला माहिती नाही. मला आता नि. १२६ लगत दाखल केलेले २ छायाचित्र दाखवले. ते दोन्ही छायाचित्र हे स.क्र. २८ हि.क्र ३ मध्ये आम्ही सॉ मिल सुरू केली त्या शेडचे आहेत. त्यास एकत्रित **नि. १२८** दिली. मी सॉ मिल स्थलांतरीत करण्यासाठी उपवन संरक्षक सावंतवाडी यांच्याकडे परवानगी मागितली होती. त्यासाठी मी स्वत: अर्ज केला होता. त्या अर्जाची माहितीच्या अधिकारात दिलेली सहिशिक्याची नक्कल मला दाखवली ती तीच आहे. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि. १२९** दिली आहे. हे म्हणणे खरे आहे की, स.क्र. २८ हि.क्र. ३ हि मिळकत कासम हुसेन खान, फातिमाबी इब्राहिम शेख, रहिम इब्राहिम खान व आयुब इब्राहिम खान यांच्या मालकीची आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यांनी त्यांच्या जमीनीत आरा गिरण सुरू करण्यासाठी मला संमतीपत्र दिलेले आहे. मला आता ते दिनांक ०७/०७/२०१५ व दिनांक २२/०६/२०१५ रोजीचे संमती पत्र यांच्या माहितीच्या अधिकारात मिळवलेल्या सत्यप्रती दाखवल्या. त्यावर लिहून घेणार म्हणून माझे नांव व सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **नि. १३० व १३१** दिली आहे. हे म्हणणे खरे आहे की, जी १५९ मधील सॉ मिल स्थलांतरित केल्यामुळे तशी सॉ मिल तेथे चालवण्याचा सध्या आम्हाला अधिकार व परवानगी नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीत चिरीव लाकूड व गोल लाकूड साठवून ठेवण्याचा मला कोणताही अधिकार नाही.

३५. हे म्हणणे खरे नाही की, नुगेरा यांचा दावा मिळकतीतील हक्क फक्त सॉ मिल पुरता होता. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीतील आमचा हक्कसुध्दा केवळ सॉ मिल पुरता मर्यादीत होता. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये पिठाची गिरणी व भाताचा हॉलर कधीही नव्हते व आजही नाही. हे म्हणणे खरे नाही की, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार सावंतवाडी शहरातील लोकवस्ती असलेल्या भागात आरा गिरण चालवणे बेकायदेशीर झालेले होते.

३६. हे म्हणणे खरे नाही की, मी बांधकाम व्यवसायिक आहे. दावा मिळकतीचा आजच्या बाजार भावाप्रमाणे प्रतिगुंठा भाव पंधरा लाख रूपये इतका आहे हे मला माहिती नाही. दावा मिळकतीतील अंदाजे साडेचार गुंठे जमीन आमच्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या ताब्यातील भागाचे मासिक भाडे रूपये तीस हजार इतके आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादीने दावा मिळकतीचा ताबा मागूनही आम्ही त्यांना ताबा दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीने

आमच्याकडून प्रतिमहा रूपये पंचवीस हजाराची नुकसानीची केलेली मागणी योग्य व कायदेशीर आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीने माझ्या विडीलांना नोटीस पाठवून आमचा दावा मिळकतीतील भाडोत्रीपणाचा हक्क संपुष्टात आणलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, जी—१५९ हा इमला आजही कमलाबाई काशिनाथ दुभाषी यांच्या नांवावर नोंदलेला आहे. साक्षीदार सांगतो की, ती माझी आजी आहे.

३७. माझे वडील व कमलाबाई यांनी वादीविरूध्द रेदिमुक्र. ८८/२००२ चा दावा दाखल केला होता व तो सन २०१२ मध्ये नामंजुर करण्यात आलेला आहे हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या आरा गिरण परवान्याचा क्रमांक १७/२०१२ असा आहे. सुरूवातीचा परवाना माझ्या वडिलांच्या नांवाने होता. तो परवाना माझ्या नांवावर होण्याकरीता मी न्यायालयात वारस दाखला मिळण्यासाठी प्रकरण दाखल केले हे मला आठवत नाही. ते प्रकरण न्यायालयाने काढून टाकले हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीची मला कोणतीही आवश्यकता नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीचा ताबा मिळण्यास वादी पात्र आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

सही/—

(एम्. एस्. बुधवंत)

दिनांक :—२४/०१/२०१९. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), सावंतवाडी.